# <u>वारंवार विचारले जाणारे प्रश्न - पीएसीएल लि.च्या विषयात</u>

पार्श्वभूमी

1. पीएसीएल लि., (पीएसीएल) ने विविध सामूहिक गुंतवणूक योजनांमधून (कलेक्टिव इनव्हेस्टमेंट स्कीम्स - सीआयएस) रु. 49000 कोटी (अंदाजे) एकत्रित दायित्वातून/एकत्रपणे उभे केले असा दावा केला होता. सेबीच्या 22 ऑगस्ट 2014 च्या आदेशानुसार, पीएसीएलच्या योजना ह्या सीआयएस स्वरुपाच्या आहेत आणि इतर आंतर मुद्द्यांसह ऑफरच्या अटींनुसार तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यांच्या ग्राहकांना देय असलेले संकलित पैसे परताव्यासह परत करण्याचे आदेश दिले.

2. पीएसीएल त्याचे प्रवर्तक/संचालकांनी माननीय रोखे अपिलीय न्यायाधिकरण (सिक्युरिटीज अपिलेट ट्रिब्युनल - एसएटी) कडे अपील केले, ज्यांनी त्यांचे अपील फेटाळले आणि सेबीचा आदेश कायम ठेवला. 14 ऑगस्ट 2015 दिनांकित आदेशाने उद्विग्न होऊन एसएटीच्या आदेशांवर टीका करत माननीय सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यात आले.

3. माननीय सर्वोच्च न्यायालयाने 2 फेब्रुवारी 2016 रोजी पीएसीएल लि. वि. भारतीय सिक्युरिटीज् एण्ड एक्सचेंज बोर्ड्स (नागरी अपील क्र. 13394/2015) आणि इतर संबंधित विषयांबाबतच्या आपल्या आदेशाने माननीय श्री. न्यायमूर्ती (निवृत्त) आर.एम. लोढा (भारताचे माजी प्रमुख न्यायाधिश) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली व ह्या समितीला पीएसीएलच्या ग्राहकांना परत करण्यासाठी, पीएसीएलच्या हक्कलेखांचा ताबा घेण्याचे अधिकार दिले.

4. त्यानुसार, ज्यांनी पीएसीएल लि. च्या विविध योजनांमध्ये गुंतवणूक केली आहे, त्यांच्या खरेपणाचे सत्यापन केल्यानंतर, पीएसीएलच्या ग्राहकांना परतावा देण्यासाठी मालमत्तांची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया प्रारंभ करण्यासाठी समिती सीबीआयकडून पीएसीएलचे मालमत्तेचे दस्तऐवज संकलित करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे. मधल्या वेळात, पीएसीएलच्या ग्राहकांना सार्वजनिक सूचनेद्वारे सूचित केले गेले आहे आणि सल्ला दिला गेला आहे;

   (i) समितीद्वारे पुढील सूचना मिळेपर्यंत पीएसीएल लि. च्या किंवा पीएसीएल लि. कडे असलेल्या योजनांमधील त्यांच्या गुंतवणूकांच्या नोंदी/दस्तऐवज फेकून देऊ नयेत आणि/किंवा सामायिक करू नयेत; आणि

   (ii) पीएसीएल लि. किंवा त्यांचे अधिकारी/एजंट्स इ. कडे कोणतीही नवीन गुंतवणूक करू नये किंवा हप्त्यांचे कोणतेही प्रदान करू नये.

1. मी पीएसीएलचा/ची ग्राहक आहे. मी काय करावे?

उत्तर: सार्वजनिक सूचना दिनांकित 05.03.2016 द्वारे पीएसीएलच्या ग्राहकांना मूळ दस्तऐवज स्वतःकडे ठेवण्याबाबत सावध करण्यात आले आहे. समितीद्वारे पीएसीएलच्या ग्राहकांचे दावे आमंत्रित केल्याची सूचना मिळाल्यानंतर ते दस्तऐवज स्थापन समितीकडे किंवा नियुक्त प्राधिकाऱ्यांकडे दिले जाऊ

शकतात. परताव्याचा दावा करताना मूळ दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे ज्याशिवाय परताव्याच्या कोणत्याही दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

2. परताव्यासाठी मी माझा अर्ज कुठे पाठवावा?

उत्तर: सेबी/समिती जाहिरात/सार्वजनिक सूचना इ. द्वारे पीएसीएलच्या ग्राहकांना सूचित करेले आणि पीएसीएलच्या ग्राहकांकडून दावा/वे मागवेल. अशी जाहिरात/सूचना येईपर्यंत, ग्राहकांनी सर्व मूळ दस्तऐवज आपल्याकडेच ठेवावे आणि कोणाही व्यक्ती, एजंट इ.सह सामायिक करू नयेत, हस्तांतरित करू नयेत किंवा सुपूर्त करू नयेत.

3. परताव्यासाठी मी माझा अर्ज कधी आणि कुठे पाठवावा?

उत्तर: पीएसीएलच्या ग्राहकांना सल्ला दिला जातो की विशिष्ट सूचनेनंतर, विनिर्दिष्ट केल्यानुसार आवश्यक दस्तऐवजांसह परताव्याचा अर्ज (एएफआर) जाहिरात/सार्वजनिक सूचनेमध्ये नमूद केलेल्या/विनिर्दिष्ट केलेल्या पत्ता/अधिकाऱ्याकडे सादर केला जाईल.

4. पीएसीएल लि.च्या ग्राहकांकडून सेबी दावे कधी मागवेल?

उत्तर: पीएसीएलच्या मालमत्तांची विल्हेवाट लावून पुरेशी रक्कम उपलब्ध झाली की पीएसीएल लि.च्या ग्राहकांकडून दावे मागवेल जातील. समितीद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या फॉरमॅटमध्ये समिती परताव्यासाठीचे अर्ज ग्राहकांकडून मागवेल.

5. माझ्या योजनेची परिपक्वता तारीख आधीच पूर्ण झालेली आहे आणि पीएसीएलचे एजंट्स मला गुंतवणूकीसाठी पर्यायी साधन/योजना देऊ करण्यास तयार आहेत, काय करावे याबाबत कृपया मला सल्ला द्या?

उत्तर: मूळ दस्तऐवज राखून ठेवावे आणि मागीतल्यावर परताव्यासाठी सादर करावे असा सल्ला दिला जातो. विद्यमान गुंतवणूका त्यांच्या इतर योजनांमध्ये रुपांतरीत किंवा स्विच करण्यासाठी पीएसीएल किंवा त्यांच्या एजंट्ससह कोणाकडूनही येणाऱ्या कोणत्याही दबावाला बळी पडू नये असा सल्ला दिला जातो. पीएसीएलच्या मालमत्ता विकल्यानंतर पीएसीएल लि. च्या खऱ्या ग्राहकांना परतावा देण्याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने समितीकडे विश्वासाने काम सोपवण्या आले आहे. दिलेल्या निर्देशांपासून ढळण्याचा कोणत्याही व्यक्तीकडून प्रयत्न झाल्यास ते माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन असेल आणि त्यामुळे त्याचा सल्ला दिला जात नाही.

6. मधल्या काळात मी काय करावे?

उत्तर: तुम्ही सेबी/समितीने वर्तमानपत्रे इ. मध्ये दिलेल्या प्रेस रिलीज/जाहिरात इ. वर लक्ष ठेवू शकता. तुम्ही सेबीच्या वेबसाईटवरही लक्ष ठेवू शकता www.sebi.gov.in. किंवा खालील टोल मुक्त हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधू शकता 1800 266 7575 किंवा 1800 22 7575.